**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:28.03.2025** **वार:शुक्रवार**

---

1. वित्त विधेयकाला संसदेची मंजुरी
2. स्थलांतरित आणि परदेशी नागरिक विधेयक लोकसभेत संमत
3. देशात लवकरच सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार
4. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा राज्यात साखर उत्पादनात घट होण्याचा अंदाज आणि
5. दिव्यागांच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पटकावली 43 पदकं

**संसद**

राज्यसभेत काल वित्त विधेयकावर चर्चा होऊन ते लोकसभेकडे परत पाठवण्यात आल्यानं 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या संसदीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाली. करनिश्चिती करणं, व्यवसाय सुलभतेला चालना देणं आणि भारतीय करदात्यांचा सन्मान करणं हा 2025 च्या वित्त विधेयकाचा मुख्य उद्देश असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सभागृहात वित्त विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना सांगितलं. लोकसभेत काल झालेल्या अन्य महत्त्वपूर्ण कामकाजाबाबतचा हा वृत्तांत...

**स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक, 2025 काल लोकसभेत संमत करण्यात आलं. स्थलांतरविषयक कायद्यांचं आधुनिकीकरण करणं आणि पारपत्रं, प्रवासविषयक दस्तऐवज, व्हिसा आणि नोंदणी यासंदर्भात केंद्र सरकारला काही विशिष्ट अधिकार देणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकावर सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना देताना गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सुरक्षा बळकट करण्याच्या दृष्टीनं हे विधेयक अत्यंत महत्त्वाचं असल्याचं सांगितलं. स्थलांतरितांचं स्वागत करून त्यांचं रक्षण करण्याचा भारताला दीर्घकाळचा इतिहास आहे. जे लोक देशाची अर्थव्यवस्था आणि विकासात योगदान देतात त्यांचं नेहेमीच इथं स्वागत केलं गेलं आहे. मात्र आता आश्रयासाठी नव्हे तर स्वार्थी हेतूनं येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. बांगलादेशी असोत किंवा रोहिंग्या ते जर देशाची शांतता धोक्यात आणण्यासाठी इथे येत असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही शहा यांनी दिला.**

**केंद्र सरकार ओला-उबर यासारख्या व्यावसायिक सेवांच्या धर्तीवर सहकार टॅक्सी हा सहकारी तत्त्वावर चालवला जाणारा उपक्रम सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल केली.....**

**आनेवाले दिनों मे कुछ ही महिनोंमे को ओप्रेटीव बेसिस पर ओला उबर जैसी एक बहोत बडी को-ओप्रेटीव सहकार टॅक्सी आनेवाली है। जो टू व्हीलर टॅक्सी का भी रजिस्ट्रेशन करेगी जो रिक्षा का भी रजिस्ट्रेशन**

**करेगी, ओर फोर व्हीलर का भी करेगी, ओर इसका मुनाफा किसी दंडा सेठोन्के हाथ में नही जायेगा मान्यवर वो ड्रायव्हर के पास जायेगा | इस प्रकारकी हम को-ओप्रेटीव लेके आ राहे है |**

**देशातल्या सहकार प्रणालीतली विमा प्रकरणं हाताळण्यासाठी लवकरच सहकारी विमा कंपनी स्थापन करण्यात येणार असल्याचंही शहा यांनी सांगितलं.**

**पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्गासाठी नवी ग्रीन अलाइनमेंट तयार केली जात असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल लोकसभेत सांगितलं.....**

**पुने से संभाजीनगर ये महत्वपूर्ण रस्ता है जो पश्चिम महाराष्ट्र ओर मराठवाडा को जोडता है | पुना ये ऐसी सिटी है के पुरे महाराष्ट्र का मुंबई के साथ जैसा संबंध है, वैसा पुना के साथ है | ओर इसके लिये हमने इससे मार्ग निकाला है की पुने से अहमदनगर ओर ओरंगाबाद जो रस्ता था इसका जो मॉडेल था हमने उसीसे ये रस्ता बनाया है | ओर हमने ग्रीन अलायमेंट तयार की है | पुना से संभाजी नगर जो आज 6 7 घंटे लग रहे है थे, वो पुना से संभाजी नगर 2 घंटे मे होगा |**

**शिवराजसिंह-डाळी**

केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध आहे; त्याच अनुषंगानं शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतमाल किमान आधारभूत किंमतीनं खरेदी करण्याचं काम सुरू असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल दिली. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि तेलंगणमध्ये सध्या शेतकऱ्यांकडून किमान हमी भावानं धान्यखरेदी सुरू आहे. त्या पार्श्र्वभूमीवर एमएसपीपेक्षा कमी भावानं ही खरेदी होणार नाही याची या राज्यांनी खबरदारी घ्यावी, असंही चौहान यांनी सांगितलं.

**पंतप्रधान-दौरा-नागपूर**

नागपूरमधील माधव नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या भूमिपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 30 मार्च रोजी नागपुरात येत आहेत. पंतप्रधानांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी काल तयारीचा आढावा घेतला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना दिल्या.

**जिंदाल**

जिंदाल स्टेनलेस स्टील राज्यात 42 हजार 500 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामुळे राज्यात 15 हजार 500 रोजगार निर्माण होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या संदर्भात जिंदाल स्टेनलेस स्टीलचे प्रमुख रतन जिंदाल यांनी काल मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.

**गौरव द्विवेदी-मुंबई**

देशात प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात गेल्या वर्षी सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल झाली, तर जाहिरातीतून मिळणारा महसूल 8 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांनी वाढला आहे. फिक्की आणि अन्स्ट अँड यंग या संस्थांनी प्रकाशित केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. मुंबईत काल एका कार्यक्रमात हा अहवाल प्रकाशित

करण्यात आला. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वेव्ज उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

**साखर**

राज्यात यंदा 200 कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू केला होता. त्यापैकी आतापर्यंत 102 कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. ऐकुया अधिक वृत्तांत...

**यंदा राज्यात 99 सहकारी आणि 101 खासगी अशा 200 कारखान्यांनी साखर गाळप हंगाम सुरू केला होता. मात्र, गेल्या वर्षाच्या अति पावसामुळे ऊस लागवडीवर परिणाम झाल्याने यंदा गाळपाला आलेला ऊस तुलनेने कमी आहे. राज्यात आतापर्यंत 8 कोटी 14 लाख 92 हजार टन उसाचं गाळप झालं असून, त्यातून 76 लाख 43 हजार टन साखरेचं उत्पादन झालं आहे. राज्यात आतापर्यंत 9 पूर्णांक 38 टक्के साखर उतारा मिळाला आहे. गेल्या वर्षी याच वेळेला 9 कोटी 54 लाख 34 हजार टन उसाच्या गाळपातून 95 लाख 92 हजार टन साखरेचं उत्पादन झालं होतं. गेल्या वर्षी हवामान पोषक असल्याने राज्यात 10 पूर्णांक 5 टक्के साखर उतारा मिळाला होता. राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाच्या अंदाजानुसार राज्यात यंदा सुमारे 86 लाख टन साखर उत्पादन होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यात 24 लाख टनांची घट अपेक्षित आहे. या महिना अखेरपर्यंत राज्यातील गाळप हंगाम संपण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरु, पुणे.**

**मंत्रालय प्रवेश**

मंत्रालयात कामानिमित्त येणारे क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांना यापुढे कोणत्याही कामाकरता प्रवेश हवा असेल तर त्यांना ‘डिजीप्रवेश’ या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारेच तो मिळू शकेल. मंत्रालयाच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात; प्रवेशासाठी अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात अभ्यागतांना ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि परवानगी दिलेल्या मजल्यावरच प्रवेश करता येईल.

**कोल्हापूर आढावा बैठक**

कोल्हापूर जिल्ह्यात विकास कामं करत असताना त्या कामांचा दर्जा आणि गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करू नये तसंच भविष्यातील लोकसंख्येचा विचार करुन त्या प्रकल्पाच्या ठिकाणी सोयी-सुविधांची निर्मिती करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिले. कोल्हापूरमध्ये झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**सुर्वे**

ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांची जन्मशताब्दी पुढच्या वर्षी ऑक्टोबरपासून सुरू होत आहे; या वर्षात, नारायण सुर्वे यांच्या साहित्य संपदेवर आधारित कार्यक्रमांची निर्मिती राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयातर्फे केली जाईल आणि राज्यात विविध ठिकाणी कामगार साहित्याचा जागर केला जाईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केली. मुंबईत आयोजित सुर्वे साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल शेलार यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**अपहरण-रत्नागिरी**

एका खासगी व्यापारी नौकेवरच्या 10 खलाशांचं समुद्री चाच्यांनी अपहरण केलं असून, त्यातल्या सात भारतीयांमध्ये रत्नागिरीतल्या दोन तरुणांचा समावेश आहे. समीन मिरकर आणि रेहान सोलकर अशी त्या दोघांची नावं आहेत. त्यांचे वडील जावेद मिरकर आणि शब्बीर सोलकर यांनी काल रत्नागिरीत पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली. ही नौका मध्य आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळ गिनीच्या आखातात असताना 17 मार्चला चाच्यांनी खालशांचं अपहरण केलं. त्यांच्याबद्दल अद्याप कोणतीही माहिती कळलेली नाही.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेचा काल समारोप झाला. कालच्या अखेरच्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी टेबल टेनिसमध्ये 3 सुवर्ण, 3 कास्य पदकांची कमाई करत पदकांचा षटकार झळकावला. मुंबईच्या रिशित नथवानी, कोल्हापूरचे दत्तप्रसाद चौगुले आणि विश्व तांबेने सुवर्ण सांगता केली. विवेक मोरे, वैष्णवी सुतार आणि पृथ्वी बर्वे यांनी कास्य पदकांची कमाई केली. दत्तप्रसाद, आणि विश्व यांनी सलग दुसऱ्यांदा सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. टेबल टेनिसमध्ये सर्वसाधारण विजेतेपदाचा मानही महाराष्ट्राने पटकवला. पॅरा खेलो इंडियाच्या या दुसऱ्या पर्वात महाराष्ट्राने यंदा 18 सुवर्ण, 13 रौप्य आणि 12 कास्य अशी 43 पदकं पटकावली. ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक 23, बॅडमिंटनमध्ये 4, नेमबाजीत 3, तीरांदाजीमध्ये 2, भारोत्तोलनात 5, आणि टेबल टेनिसमध्ये 6 पदकं महाराष्ट्राच्या खात्यावर जमा झाली. हरियाणाने 104 पदकं जिंकून सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळवला.

**हवामान**

येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे; राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.